नियमित दिवाणी दावा क्र.१०८/२०२४
प्रतिक दुधाणे वि. गेनबा दुधाने व इतर
CNR NO.MHPU12-000598-2024

**निशाणी क्र. ३२ वरील आदेश.**

(दिनांक १७/०१/२०२५ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०७ ते ९ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ प्रमाणे वादीचा दावा फेटाळणे करीता दाखल केलेला आहे.

०२. वादीने नि.क्र. ३३ कडे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे.

०३. प्रतिवादी ०७ ते ०९ यांच्या म्हणण्यानुसार सदरकामी सदरील वादी यांनी सदर दावा वाटप, ठराव व निरंतर ताकीदीसाठी दावा दाखल केला असुन प्रतिवादी नंबर ७ ते ९ म्हणून नेरे विभाग सहकारी पतसंस्थातर्फे प्रशासक, सचिव व वसुली अधिकारी यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ठ केले असल्यामुळे प्रस्तूत दावा सदरील प्रतिवादी यांच्या विरूध्द दाखल करण्यापुर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १६४ नुसार दोन महीने आगाऊ नोटीस देणे कायदयाने बंधनकारक आहे. परंतु वादी यांनी सदरची कोणतीही नोटीस प्रतिवादी नंबर ७ ते ९ यांना जारी केलेली नाही. वादीचे कृत्य हे प्रत्यक्षरित्या संस्थेच्या व्यवसायाला स्पर्श करीत आहे (Touching to the business of society ) त्यामुळे प्रस्तूतचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहीता ऑर्डर ७ रूल ११(ड) अन्वये रद्द होण्यास पात्र आहे.

०४. तसेच वादी वाटप व प्रतिवादी नंबर ३ यांस तहसिलदार मार्फत आलेली नोटीस, लिलावाची प्रक्रिया आव्हानित करीत आहेत. प्रस्तूत प्रकरणामध्ये महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदींनुसार रिकव्हीरी ऑफिसर यांच्याकडे प्रस्तूत प्रकरणा विषयी हरकत न नोंदविता प्रस्तूतचा दावा दाखल केलेला असल्यामुळे प्रस्तूतचा दावा चालविण्याचा अधिकार हा या न्यायालयास नसल्याचे देखील कथन केले आहे. करीता प्रस्तुत

प्रतिवादींनी वादीचा सदरचा अर्ज मंजुर करुन वादीचा दावा फेटाळण्याकरीता अर्ज केला आहे.

०५. वादीने प्रतिवादींच्या अर्जास नि. क्र.३३ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदवून अर्ज वादीस मान्य नसल्याचे कथन केले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार वादीचा दावा मिळकतीतील pre-existing राइट आहे. दावा वाडिलीपार्जित मिळकतीचा असल्याने वादीचा दावा मिळकतीत हिस्सा असुन सदर दाव्यामुळे प्रतिवादीच्या व्यवसायाला स्पर्श होणार नाह. तसेच वादी गहानखत लिहून देणारा ऋणको नसल्याने त्यांचा महा. सह. संस्था अधिनियमातील तरतुदी प्रमाणे हरकत नोंदविण्याचे कारण नाही. वादिस त्यांच्या हिस्याच्या संरक्षणासाठी भांडणे गरजेचे असल्याने त्याने न्यायालयात दावा दाखल केला आहे. करीता प्रतिवादींनी सि.पी.सी. ऑ.७ रुल ११ चा दिलेला अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादींनी केली आहे.

०६. अभिलेखाची पाहणी केली. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. तसेच लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. अभिलेखावरील दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

०७. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थिती झाले असून त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निषर्क |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ प्रमाणे फेटाळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः</u>-**

०८. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे मी अभिलेखासह विचारात घेतले. वादींनी प्रस्तुतचा

दावा वाटप आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादींनी वाद मिळकती सरसनिरस मानाने वाटप होवुन वादीचा कायदेशीर हिस्सा तुटक करुन मिळण्याची मागणी केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी वाद मिळकतीची जप्ती करुन विक्री करु नये अशी निरंतर ताकीद देण्याची विनंती केली आहे. याव्यतिरिक्त वादींनी वाद मिळकत ही वडिलोपार्जित एकत्र कुटूंबाची मिळकत असुन त्यामध्ये वादीचा कायदेशीर हिस्सा असल्याचे तसेच वाद मिळकतवर कर्ज घेता वेळी तो अल्पवयीन असल्याचे त्याने कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे नेरे विभाग सहकारी पतसंस्था असुन त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १६४ नुसार दोन महिने आगाउ नोटीस न देता दावा दाखल केल्याचे वादीचे कृत्य संस्थेच्या व्यवसायाला स्पर्श करणारे असल्याने दावा रद्द करणेची विनंती केली आहे. प्रतिवादींनी वाद मिळकत ही वडिलोपार्जित असल्याचे कोठेही नाकारलेले नाही. दाखल कागदपत्र सातबारा उतारा यांचे अवलोकन करता वाद मिळकत वडिलोपार्जित सामाईक हिस्स्याची असल्याचे निदर्शणास येते. त्यामुळे वाद मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा असल्याची बाब नाकारता येणारी नाही. तसेच वादी आणि प्रतिवादी यांनी कथन केलेल्या बाबीसंबंधाने स्पष्ट पुरावा येणे गरजेचे आहे. याव्यतिरिक्त वादीचा वाद मिळकतीमध्ये हिस्सा असल्याने त्याकरीता दाद मागणे हा वादीचा नैतिक अधिकार आहे. सबब, प्रथम दर्शनी दावा प्रतिवादी क्र. ७ ते ९ बाजुने शाबीत होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ करीता नकारार्थी उत्तर नोंदवुन मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करत आहे.

:: **आदेश** ::

०१. अर्ज फेटाळण्यात येतो.

JADHAV MEENA WAMAN Digitally signed by JADHAV MEENA WAMAN Date: 2025.01.20 12:33:05 +0530

**भोर** **( मीना वामन जाधव)**

**दिनांकः १७/०१/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भोर .**

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Hon'ble Smt. Meena W. Jadhav<br>C.J.J.D. & J.M.F.C., Bhor, Pune |
| Name of the Steno | :- | M. S. Kondhare L.G. |
| Date of Order | :- | 17/01/2025 |
| Signed by P.O. | :- | 17/01/2025 |
| Order uploaded on | :- | 20/01/2025 |